# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.मनपा/सा.प्र.०२९८/२०१६
दि.०७/१०/२०१६.

**प्रत्यायोजन आदेश**

संदर्भः- सामान्य प्रशासन विभाग जा.क्र.मनपा/सा.प्र./१५७४/२०१५-१६
दि.३०/१२/२०१५

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये, उपायुक्त यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांमध्ये फेरबदल करण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये, खाली दर्शविलेल्या खात्यांचे व विभागांचे प्रशासन आणि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्ये, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील नमुद उपायुक्त त्यांचे नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यात येत आहेत.

अ) **श्री.विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय)**

१) सामान्य प्रशासन (सुरक्षा व प्रभागांचे प्रशासन)/आस्थापना विभाग
२) स्थानिक संस्था कर विभाग
३) जनसंपर्क विभाग
४) संगणक विभाग व नागरी सुविधा केंद्र
५) निवडणूक विभाग
६) परिवहन विभाग
७) कर विभाग (मालमत्ता कर व इतर किरकोळ कर वसुली मोकळ्या जागेवरील कर वगळून)
८) परवाना विभाग
९) वाहन विभाग

ब) **श्री.संभाजी पानपट्टे, उपायुक्त**

१) घन कचरा व्यवस्थापन (प्रकल्पासह)
२) आरोग्य विभाग (साफसफाई)
३) वैद्यकिय आरोग्य प्रशासन (NUHM प्रकल्पासह)
४) महिला व बालकल्याण विभाग
५) जन्म-मृत्यू विभाग
६) स्वच्छ भारत/स्वच्छ महाराष्ट्र अभियान नियंत्रण व अंमलबजावणी

क) दिपक पुजारी, उपायुक्त

१) अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण व फेरीवाला धोरण अंमलबजावणी व नियंत्रण विभाग (स्वतंत्र पदभार)
२) अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग
३) भांडार विभाग
४) ग्रंथालय विभाग
५) अभिलेख विभाग
६) शिक्षण विभाग
७) क्रिडा विभाग
८) बाजार लिलाव विभाग
९) पे ॲन्ड पार्क, भुईभाडे
१०) जाहिरात विभाग

संबधित उपायुक्तांनी वरील कामकाज, वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजीत केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरणे मंजुर करण्यापुर्वी मुख्यलेखा परीक्षक यांची सहमती घेण्यात यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पुर्व मान्यतेने व मंजुरीनेच पाठवणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पहात असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, ह्या सर्व प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

यापुर्वी, यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन सदर आदेश पारीत करण्यात येत आहे.

(डॉ.नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रतः-
१) उपायुक्त (सर्व)
२) मुख्य लेखा परीक्षक
३) मुख्य लेखा अधिकारी
४) खातेप्रमुख/विभागप्रमुख (सर्व)
५) आदेश नस्ती

प्रतः- माहितीस्तव,
१) मा.महापौर
२) मा.उप-महापौर
३) मा.सभापती, स्थायी समिती सभा
४) मा.सभागृह नेते
५) मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती